## सावधानता:

बायो शिल्ड पुट्टी 45% स्वच्छ पिण्यायोग्य पाण्यामध्ये मिसळा

बायो शिल्ड पुट्टी मिश्रण तयार करणे अतिशय महत्वाचे आहे, म्हणूनच स्मूथनेस आणि कव्हरेजचे हवे असलेले / इच्छित उत्तम परिणाम मिळवण्यासाठी हाताने किंवा मेकॅनिकल स्टररने व्यवस्थित आणि सुयोग्य मिश्रणासाठी खूप काळजी घेणे आवश्यक आहे. एकसारखी पेस्ट तयार होईपर्यंत मिसळत रहाणे आवश्यक आहे.

3.5 तासात वापरले जाईल इतकेच बायो शिल्ड पुट्टीचे मिश्रण तयार केले पाहिजे.

- बिरला व्हाईट बायो शिल्ड पुट्टी मुलांपासून दूर ठेवली पाहिजे.
- गिळली गेल्यास धोकादायक आहे. पोटात गेल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्या
- जर त्वचेवर आग होऊ लागली किंवा राहिली / जर त्वचेची जळजळ होऊ लागली किंवा होत राहिली तर भरपूर पाण्याने धुवून घ्या आणि त्वरित वैद्यकीय मदत घ्या.

### हे करा:

- भिंतीचा पृष्ठभाग स्वच्छ / हलके कण नसलेला आहे याची खात्री करा.
- वापरण्यापूर्वी व्यवस्थित ढवळून घ्या.
- कोरड्या आणि थंड जागी ठेवा.
- लावत असताना सुरक्षा गॉगल्स घाला. जर डोळ्यांशी संपर्क आला तर भरपूर पाण्याने धुवून घ्या आणि त्वरित वैद्यकीय मदत घ्या.
- सँडींग करताना आणि पृष्ठभाग तयार करताना धूळ श्वासामार्गे शरीरात जाणे टाळण्यासाठी योग्य तो नोझ मास्क घालण्याची शिफारस केली जाते.
- बिरला व्हाईट बायो शिल्ड पुट्टी मुलांपासून दूर ठेवा.

### हे करू नका:

- अस्वच्छ / सैल कण असलेल्या पृष्ठभागावर बिरला व्हाईट बायो शिल्ड पुट्टी थेट लावू नका.
- शिफारस केलेल्याहून / निर्देशित प्रमाणापेक्षा जास्त पाणी मिसळू नका.

Birla White BIO-SHIELD Putty ™


**बिरला व्हाईट – युनिट ऑफ अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड,**
ग्राउंड फ्लोअर, अहुरा सेंटर, 82, महाकाली गुंफा रोड,
एम.आय.डी.सी. ऑफिसजवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र 400 093.

वेबसाईट : www.birlawhite.com | टोल फ्री क्र.: 1800 11 1717
www.facebook.com/BirlaWhiteCement | twitter.com/BirlaWhite


ADITYA BIRLA UltraTech Birla White BIO-SHIELD Putty

# बिरला व्हाईट
## बायो शिल्ड पुट्टी
### भिंतींवर लावा, शुभ्रता आणि सुरक्षितता दोन्ही मिळवा




## भारतातील पहिली अँटी व्हायरल पुट्टी

# भिंतींवर लावा,
# शुभ्रता आणि सुरक्षितता दोन्ही मिळवा




बिरला व्हाईट बायो शिल्ड पुट्टी ही भारतातली पहिली अँटी व्हायरल पुट्टी आणि प्रिमीयम दर्जाची व्हाईट सिमेंट-बेस्ड पॉलिमर-मॉडीफाईड पुट्टी आहे, ज्यामध्ये अँटी व्हायरल आणि अँटी मायक्रोबियल गुणधर्म आहेत.जंतूंपासून संरक्षणासह तुमच्या भिंतींना मार्बलसारखे फिनीश देत टॉपकोट इमल्शन्सची कामगिरी आणखीन चांगली करण्यासाठी ही तुमच्या भिंतीना अप्रतिम शुभ्रतेसह, देते सुरक्षित आणि हायजिनीक पुट्टी पृष्ठभाग.

जंतू सुरक्षेसह एक्सेल पुट्टी

सिल्व्हर इऑन तंत्रज्ञान

अँटी व्हायरल, अँटी बॅक्टेरियल, अँटी फंगी, अँटी अल्गे

एनएबीएल मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत झालेले परिक्षण

## आवश्यक साधने

- मिश्रण एकसारखे होण्यासाठी मेकॅनिकल स्टररचा वापर केला पाहिजे.
- लावण्याच्या कामासाठी पुट्टी ब्लेड / स्पॅटुला आणि गुरमला.

## लावण्यासाठीची व्याप्ती

हे उत्पादन **बाहेरील** / **अंतर्गत** पृष्ठभागावर सिमेंट बेस्ड प्लास्टर / कॉंक्रीट / मोर्टरच्या भिंती आणि सिलींगच्या पृष्ठभागावर दोन कोट्समध्ये 1.5 मि.मी जाडीसह लावता येते. / हे उत्पादन सिमेंट बेस्ड प्लास्टर / कॉंक्रीट / मोर्टरच्या भिंती यांसारख्या **बाहेरील** / **अंतर्गत** पृष्ठभागावर आणि सिलींग पृष्ठभागावर दोन कोट्समध्ये 1.5 मि.मी जाडीपर्यंत लावता येते. या उत्पादनामध्ये क्युरींग फ्री गुणधर्म आहे.

## टप्पा 1 - पृष्ठभागाची तयारी

बिरला व्हाईट बायो शिल्ड पुट्टी लावण्यापूर्वी धूळ, घाण, ऑरगॅनिक सॉल्व्हंट (डी-शटरींग / क्युरींग फ्री कंपाऊंड), तेल इ. सैलसर घटक इमेरी कागद, पुट्टी ब्लेड किंवा वायर ब्रश वापरून पृष्ठभागावरून काढून घ्या. पृष्ठभाग धूळ, ऑरगॅनिक सॉल्व्हंट आणि सैलसर घटक नसलेला स्वच्छ असायला हवा.

## टप्पा 2 - बिरला व्हाईट बायो शिल्ड पुट्टी मिसळणे

बिरला व्हाईट बायो शिल्ड पुट्टी 45% स्वच्छ पाण्यामध्ये हळूहळू मिसळा (1 किलो बायो शिल्ड पुट्टी+450 मिली पाणी)आणि पेस्ट तयार करा. शक्यतो पुट्टी आणि पाणी मिसळणे मेकॅनिकल स्टररने 3 ते 5 मिनीटे करावे. अन्यथा जास्त कव्हरेज मिळण्यासाठी तुम्ही धातूची सळी वापरून जोरात 10-15 मिनीटे मिसळू शकता. एकदा हे झाल्यावर चांगले परिणाम मिळण्यासाठी, व्यवस्थितपणे मिसळल्यानंतर पेस्ट 5 मिनीटे तशीच ठेवून द्या. 3-3.5 तासात वापरून होईल इतकेच मिश्रण तयार होईल याची खात्री करा.

## टप्पा 3 - बिरला व्हाईट बायो शिल्ड पुट्टी लावणे

बिरला व्हाईट बायो शिल्ड पुट्टी प्री वेटींग फ्री आहे त्यामुळे बायो शिल्ड पुट्टी लावण्याआधी पृष्ठभाग ओला करणे आवश्यक नाही. तुम्ही अशाप्रकारे लावू शकता,

- बायो शिल्ड पुट्टी व्यवस्थित मिसळल्यानंतर, पुट्टी ब्लेडच्या मदतीने भिंतीवर / पृष्ठभागावर पहिला थर एकसारखा लावा. लावत असताना पृष्ठभागाचे तापमान 40 अंश सेंटीग्रेडपेक्षा जास्त वाढणार नाही याची खात्री करा.
- बायो शिल्ड पुट्टीचा पहिला थर वाळल्यानंतर, सैल कण काढण्यासाठी पृष्ठभाग ओल्या स्पंजने किंवा पुट्टी ब्लेडने हलकेच घासून घ्या.
- पृष्ठभाग किमान 3 तास वाळू द्या आणि नंतर बायो शिल्ड पुट्टीचा दुसरा थर लावा. झाल्यानंतर पृष्ठभाग पूर्णपणे वाळू द्या.
- टॉपकोट पेंट / डिस्टेंपर लावण्यापूर्वी पृष्ठभाग 10 ते 12 तास वाळण्यासाठी ठेवा.
- बायो शिल्ड पुट्टीचा शेवटचा थर खरखरीत इमेरी कागदाने जोरात घासू नये अशी शिफारस केली जाते यामुळे पुट्टीच्या पाणीरोधक गुणधर्मावर परिणाम होऊ शकतो. तरीही जर कोणताही पेंट / डिस्टेंपर लावण्यापूर्वी ओबडधोबडपणा / पॅचेस काढण्याची आवश्यकता असेल, चमकदार शुभ्र पृष्ठभाग हवा असेल तर 500 नंबरपेक्षा कमी नसलेल्या अतिशय फाईन अशा वॉटरप्रूफिंग इमेरी कागदाने पृष्ठभाग हलकेच सपाट करून घ्या.
- दोन्ही थरांची एकूण जाडी जास्तीतजास्त 1.5 मिमी इतकी मर्यादित असली पाहिजे.

## तांत्रिक तपशील

| अ.क्र | तांत्रिक निकष | तपशील | ठराविक श्रेणी |
|---|---|---|---|
| 1. | *कव्हरेज (चौ.मीटर / किग्रॅ / दोन थर) [ आदर्श स्मूथ पृष्ठभागावर ] | 1.67-1.95 | इन-हाऊस |
| 2. | पॉट लाईफ (तास) | 3.0-3.5 | इन-हाऊस |
| 3. | टेंसाईल अॅधेशन स्ट्रेंथ @28 दिवस (N/m$^2$) | ≥ 1.1 | ईएन 1348 |
| 4. | वॉटर कॅपिलरी अॅब्सॉर्प्शन (मिली), 30 मिनीटे @28 दिवस | ≤ 0.60 | कर्स्टन ट्यूब |
| 5. | कॉंप्रेसिव्ह स्ट्रेंथ @28 दिवस (N/m$^2$) | 3.5-7.5 | ईएन 1015-11 |
| 6. | बल्क डेन्सिटी (ग्रॅम/सेंमी$^3$) | 0.8-1.0 | इन-हाऊस |

*हे मूल्य स्मूथ पृष्ठभागावरील आहे. पृष्ठभागाचा पोत असेल त्यानुसार त्यात बदल होऊ शकतो.